# आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

# सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वे

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग,

## मंत्रालय, मुंबई-४०००३२

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२**
**दिनांक: १२ जुलै, २०१६**

**वाचा :-**

१) **शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-२०११/ प्र.क्र-४७ /का-१४८२, दि.१३ सप्टेंबर, २०११**
२) **शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०५१६/प्र.क्र-७९/का-१४८२, दि. २१ जून, २०१६**

**प्रस्तावना :-**

"लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम" राज्यात सन १९८४-८५ या वित्तीय वर्षापासून राबविण्यात येत आहे. सन १९९०-९१ मध्ये या कार्यक्रमाचे नामानिधान "स्थानिक विकास कार्यक्रम" असे करण्यात आले. सन १९९६-९७ पासून या कार्यक्रमाचे नाव "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" असे बदलण्यात आले. ज्या कामांना जिल्हा नियोजन समितीत प्राधान्य व महत्व मिळत नाही किंवा जी कामे जिल्हा योजनेत घेण्यात येत नाहीत अशी लोकोपयोगी कामे या योजनेतून घेतली जातात. हा कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती व या कार्यक्रमांतर्गत कोणकोणती कामे हाती घेता येतील याबाबतचे मार्गदर्शन शासन स्तरावरुन वेळोवेळी करण्यात येते. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत,संदर्भाधीन शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक-स्थाविका-२०११/ प्र.क्र-४७ /का-१४८२ दि.१३ सप्टेंबर २०११, अन्वये सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच त्यामध्ये असलेल्या विविध तरतुदीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय / शासन परिपत्रके व शासन पत्रे रद्द करुन सदर मार्गदर्शक सूचना अद्ययावत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

राज्य मंत्रीमंडळाच्या दि. ७ जून २०१६ रोजी झालेल्या बैठकीत, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दती यामध्ये अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता अभ्यास करून अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संदर्भाधीन दि. २१ जून २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली. सदर मंत्रीमंडळ उपसमितीची दि. २८जून २०१६ रोजी बैठक होऊन आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निर्गमित करावयाच्या अद्ययावत सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना अंतिम करण्यात आल्या.

**शासन निर्णय :-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, यापूर्वी निर्गमित केलेल्या सर्व शासन निर्णयांचा तसेच खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून, होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दती यामध्ये अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता, यापूर्वीचे सर्व शासन निर्णय / शासन परिपत्रके व शासन पत्रे अधिक्रमित करून सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात येत आहेत.

२.	सदर मार्गदर्शक सूचनांची संक्षिप्त रुपरेषा पुढीलप्रमाणे आहे:-



| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | - | **शासन निर्णय** | १ ते ४ |
| २ | १ | **पार्श्वभूमी-** कार्यक्रमाचे नामानिधान व उद्देश (१.१ ते १.३) | ५ |
| ३ | २ | **वैशिष्ट्ये** - अनुज्ञेय निधी (२.१ ते २.३), नोडल जिल्हा घोषित करावयाची पध्दत (२.४), अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कल्याणाकरिता राखीव निधी (२.५) | ६ |
| ४ | ३ | **अंमलबजावणी** - कामे सुचविण्याची पध्दत (३.१), कामांना मंजूरी देण्याची पध्दत (३.२ ते ३.४), कामे मंजूर करण्याबाबत सूचना (३.५ ते ३.१०), प्रशासकीय मान्यता (३.११ ते ३.२२) , कमाल आर्थिक मर्यादा (३.१६) , दिव्यांगाकरिता (अंध,अपंग,मूकबधीर,कर्णबधीर, शारिरिक व मानसिक विकलांग) विशेष तरतूद (३.२३), नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयाकरिता पुस्तके व इतर साहित्य (३.२४), अपारंपारिक उर्जा साधनांच्या प्रकल्पाची आस्थापना करणे (३.२५ ), क्रीडा क्षेत्र (३.२७), व्यायाम शाळा (३.२८), बार असोसिएशनच्या ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणे (३.२९), महानगरपालिका व "अ " वर्ग नगरपालिका क्षेत्रातील विशेष दुरुस्तीची कामे (३.३०), जलयुक्त शिवार योजना (३.३१), आमदार आदर्श ग्राम योजना (३.३२), स्मशानभूमी/ कब्रस्थानाची कामे (३.३३), माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र (३.३४), शिक्षण क्षेत्र (३.३५), विज्ञान केंद्र (३.३६), सामाजिक सभागृह (३.३७), संबंधित प्रशासकीय विभागाच्या आर्थिक मर्यादा , अटी व शर्ती लागू रहाणे (३.३८), विशेष बाबींची प्रकरणे (३.३९), इतर विभागांनी निर्गमित केलेले शासन निर्णय / शासन परिपत्रक (३.४०) | ७ ते १५ |
| ५ | ४ | **निधी वितरण व व्यवस्थापन** (४.१ ते ४.६) | १६ |
| ६ | ५ | **संनियंत्रण** (५.१ ते ५.३), कामाची तपासणी (५.४ ते ५.६), कामांचे तपासणी अहवाल (५.७ ते ५.८), खर्च ताळमेळ (५.९) | १७ ते १८ |
| ७ | **परिशिष्ट क्र-१** | आमदारांनी अनुज्ञेय कामांच्या शिफारशी करण्यासाठी नमुना | १९ |
| ८ | **परिशिष्ट क्र-२** | या कार्यक्रमांतर्गत प्रतिबंधित कामे / बाबी (अ.क्र.१ ते १६) | २० |
| ९ | **परिशिष्ट क्र- २ अ** | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये घेता येणार नाहीत अशी कामे (अ.क्र.१ ते १०) | २१ |
| १० | **परिशिष्ट क्र- २ ब** | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली कामे यापुढेही चालू राहतील (अ.क्र.१ ते ७) | २२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | **परिशिष्ट क्र- २ क** | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली विशेष दुरुस्तीची अनुज्ञेय कामे (अ.क्र.१ ते ६) | २३ |
| १२ | **परिशिष्ट क्र- २ ड** | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय असलेल्या परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये करावयाची बदलांसह अनुज्ञेय कामे (अ.क्र.१ ते ७) | २४ |
| १३ | **परिशिष्ट क्र-३** | कामाच्या परिरक्षण व देखभालीच्या हमीपत्राचा नमुना | २५ |
| १४ | **परिशिष्ट क्र-४** | आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांवर लावावयाच्या फलकाचा नमुना | २६ |
| १५ | **परिशिष्ट क्र-५** | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या कामांच्या जिल्हास्तरीय पथकाकडून केलेल्या तपासणीसंबंधीचा त्रैमासिक अहवालाचा नमुना | २७ |
| १६ | **परिशिष्ट क्र-६** | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत पाठवावयाच्या त्रैमासिक अहवालाचा नमुना | २८ |
| १७ | **परिशिष्ट क्र-७** | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खर्च ताळमेळ घेऊन पाठवावयाच्या अहवालाचा नमुना | २९ |
| १८ | **परिशिष्ट क्र-८** | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे शिर्षवार वर्गीकरण | ३० ते ३४ |

३. माहिती व तंत्रज्ञान विभागाने, ई-निविदा कार्यप्रणाली अंवलंबिण्यासाठी दि. ६ ऑगस्ट, २०१०, १९ जानेवारी, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१४ व दि. १८ डिसेंबर, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून सद्यस्थितीत ₹ ३.०० लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू केलेली आहे. तथापि, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांसाठी सदर ई-निविदेच्या आर्थिक मर्यादेची अट ₹ ३.०० लक्ष वरून ₹ १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे सदर बाब खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी लागू करण्याच्या दृष्टीने खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या दि.१५ मे, २०१४ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांतील परिच्छेद क्र.२.६ मधील तरतूदीच्या आधारे ई-निविदेच्या आर्थिक मर्यादेची अट ₹ ३.०० लक्ष वरून ₹ १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्यासही या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०५१५३९३९२७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh R Pokharkar

Digitally signed by Dinesh R Pokharkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bdeaf5cc97f77db42116129bb7c00bde15d4ba7641 0c521d12d5a400aff9110f, cn=Dinesh R Pokharkar
Date: 2016.07.14 16:13:56 +05'30'

**( दिनेश पोखरकर )**
शासनाचे कार्यासन अधिकारी

प्रत अग्रेषित,
१) मा.राज्यपाल यांचे सचिव.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा / मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद ,
६) मा. विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य (सर्व),
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
८) मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व),
९ सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) विभागीय आयुक्त, (सर्व),
११) जिल्हाधिकारी, (सर्व),
१२) नियोजन विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,
१३) सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५) मुख्य अभियंता, (सर्व) सार्वजनिक बांधकाम विभाग,
१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१८)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१९) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२५) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२६) भारतीय जनता पाटी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०,
२७) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
२८) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१ (५ प्रती),
२९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
३०) निवड नस्ती/का-१४८२, मंत्रालय, मुंबई.

## आमदार स्थानिक विकास कार्यक्रम
## सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना
## महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग

### १. पार्श्वभुमी

**१.१ कार्यक्रमाचे नामानिधान व उद्देश:-**

विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या क्षेत्रात, स्थानिक गरजा व पायाभूत सुविधा यांची आवश्यकता विचारात घेऊन, लोकोपयोगी कामे सुचविता येणे, तसेच या कार्यक्रमांतर्गत शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, हा उद्देश समोर ठेवुन "लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम" राज्यात सन १९८४-८५ या वित्तीय वर्षापासून राबविण्यात येत आहे. सन १९९०-९१ मध्ये या कार्यक्रमाचे नामानिधान "स्थानिक विकास कार्यक्रम" असे करण्यात आले. सन १९९६-९७ पासून या कार्यक्रमाचे नांव "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" असे बदलण्यात आले. ज्या कामांना जिल्हा नियोजन समितीत प्राधान्य व महत्त्व मिळत नाही किंवा जी कामे जिल्हा योजनेत घेण्यात येत नाहीत, अशी लोकापयोगी कामे या योजनेतून घेतली जातात. हा कार्यक्रम राबविण्याची कार्यपध्दती व या कार्यक्रमांतर्गत कोणकोणती कामे हाती घेता येतील, याबाबतचे मार्गदर्शन शासन स्तरावरुन वेळोवेळी करण्यात येते.

**१.२** या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी यापूर्वी शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: स्थाविका- २०११/ प्र.क्र.४७/ का.१४८२, दिनांक १३ सप्टेंबर, २०११, अन्वये, सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. परंतु या सूचनांमध्ये विविध विधानमंडळ सदस्यांकडून सुधारणा करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले. तसेच दिनांक १३ सप्टेंबर, २०११ नंतर आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेल्या काही कामांच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याकरीता शासनाने निर्णय घेतले आहेत. त्या अनुषंगाने, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना अद्ययावत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम हे दोन्ही कार्यक्रम जिल्हाधिकारी स्तरावर राबविण्यात येतात. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना (MPLADS Guidelines) केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येत असून सदर मार्गदर्शक सूचना दि.१५ मे, २०१४ रोजी अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. दोन्ही मार्गदर्शक सूचनांमध्ये सुसंगती असावी या दृष्टीकोनातून आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांसाठी, खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांचा (MPLADS Guidelines) आधार घेण्यात आला आहे. त्यातील काही निवडक मुद्दयांचा विचार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या सूचनांमध्ये करण्यात आला आहे.

**१.३** वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमासंदर्भात आतापर्यंत निर्गमित केलेले सर्व धोरणात्मक शासन निर्णय व त्यांची शुध्दीपत्रके अधिक्रमित/रद्दबातल करुन, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तुत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांवर आधारीत काही तरतूदी तसेच खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय नसलेल्या काही तरतूदी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय ठरवण्यात आल्या असून यासंदर्भातील विशिष्ट तरतूदी परिशिष्ट क्र. २-अ, २-ब, २-क व २-ड मध्ये दर्शविलेल्या आहेत.

## २. वैशिष्ट्ये

**२.१ अनुज्ञेय निधी:-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम ही राज्य योजनांतर्गत योजना आहे. सन २०११-१२ पासुन या योजनेसाठी प्रत्येक विधानसभा मतदार संघ व विधानपरिषद सदस्याच्या कार्यक्षेत्रासाठी ₹२००.०० लक्ष निधी प्रतिवर्षासाठी अनुज्ञेय आहे.

२.२ विधानसभा सदस्यांना त्यांच्या संबंधित मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रातच कामे प्रस्तावित करता येतील.

**२.३ विधानपरिषद सदस्यांच्या बाबतीत कार्यक्षेत्राची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील:-**

| | | |
|---|---|---|
| १ | विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित | संपूर्ण राज्य |
| २ | स्थानिक प्राधिकारी संस्थांद्वारा निर्वाचित | मतदार संघाचे विहित कार्यक्षेत्र |
| ३ | पदवीधरांद्वारे निर्वाचित | मतदार संघाचे विहित कार्यक्षेत्र |
| ४ | शिक्षकांद्वारे निर्वाचित | मतदार संघाचे विहित कार्यक्षेत्र |
| ५ | राज्यपालांद्वारा विधानपरिषद नामनियुक्त | संपूर्ण राज्य |

**२.४ नोडल जिल्हा घोषित करावयाची पध्दत:-**

**२.४.१** विधानसभा सदस्यांच्या मतदार संघाचे विहित कार्यक्षेत्र (विधानसभा क्षेत्र) ज्या जिल्हयात असेल तो जिल्हा मुलभूतरित्या संबंधित विधानसभा सदस्याचा नोडल जिल्हा असेल. मात्र, ज्या विधानसभा सदस्याच्या मतदार संघाचे कार्यक्षेत्र एकापेक्षा अधिक जिल्हयात येत असेल, तर असे सदस्य त्यापैकी एक जिल्हा नोडल जिल्हा म्हणून घोषित करतील व तसे शासनास (नियोजन विभागास) कळवतील.

**२.४.२** विधानपरिषद सदस्यांनी तसेच विधानसभेवर राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या सदस्यांनी नोडल जिल्हा घोषित करणे आवश्यक आहे. नोडल जिल्हा घोषित करताना अशा सदस्यांना, जे विहीत मतदारसंघ/कार्यक्षेत्र आहे, त्याच्याशी संबंधित कार्यक्षेत्रातील कोणताही एक जिल्हा ते नोडल जिल्हा म्हणून घोषित करतील व तसे शासनास (नियोजन विभागास) कळवतील.

**२.४.३** विधीमंडळ सदस्यांनी घोषित केलेला नोडल जिल्हा नियोजन विभाग स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करुन, संबंधित जिल्हाधिकारी यांना कळवतील.

**२.५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या कल्याणाकरीता राखीव निधी:-**

या कार्यक्रमांतर्गत त्या आर्थिक वर्षात अनुज्ञेय होणाऱ्या निधीतून १०% निधीची कामे अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती कल्याणाकरीता राखीव ठेवण्यात येतील. विधान मंडळ सदस्यांची शिफारस यासाठी आवश्यक राहील. **सदरच्या कामांसाठी शिफारस न आल्यास हा निधी अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, म्हणजेच तो शासन खाती जमा करावा.**

## ३. अंमलबजावणी

### ३.१ कामे सुचविण्याची पध्दत

**३.१.१** प्रत्येक विधानमंडळ सदस्य हे त्यांचे स्वाक्षरीने अनुज्ञेय कामाची शिफारस त्यांचे लेटर हेडवर करतील. सदर कामांची शिफारस विधीमंडळ सदस्य जिल्हाधिकारी (District Authority) यांना **परिशिष्ट क्र. १** मध्ये विहित केलेल्या नमून्यात सादर करतील. त्रयस्थांकडून किंवा विधीमंडळ सदस्यांच्या प्रतिनिधीकडून केलेली कामाची शिफारस ही ग्राह्य धरण्यात येणार नाही आणि त्यावर जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**३.१.२** विधानमंडळ सदस्यांनी संबंधित आर्थिक वर्षात अनुज्ञेय निधीच्या मर्यादेत पहिल्या ३ महिन्यात सर्व कामांच्या शिफारशी करून कामे सूचविणे आवश्यक आहे.

### ३.२ कामांना मंजुरी देण्याची पध्दत

**३.२.१** जर एखादा मतदार संघ हा एकापेक्षा अधिक जिल्हयांमध्ये विभागला गेला असेल आणि विधीमंडळ सदस्यांनी घोषित केलेल्या नोडल जिल्ह्या व्यतिरिक्त अन्य जिल्ह्यात कामांची शिफारस करावयाची असेल तर विहित केलेल्या नमून्यातील कामांची यादी ती कामे ज्या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात येतात अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना अंमलबजावणीकरीता पाठवतील. या पत्राची/प्रस्तावाची एक प्रत या कामांसाठी आवश्यक तो निधी वर्ग करण्याबाबतच्या प्रस्तावासह नोडल जिल्हाधिकारी यांना पाठवतील.

**३.२.२** निधी वर्ग करण्यासाठी प्रस्ताव संबंधित विधीमंडळ सदस्यांकडुन प्राप्त झाल्यानंतर नोडल जिल्हाधिकारी, उपलब्ध निधीचा आढावा घेऊन, निधी उपलब्ध असल्यास, निधी उपलब्ध करण्याबाबतची हमी, संबंधित जिल्हाधिकारी यांना कळवतील. कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास तसे नोडल जिल्हाधिकारी, संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित विधीमंडळ सदस्य यांना कळवतील.

**३.२.३** निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची हमी संबंधित नोडल जिल्हाधिकारी यांच्याकडुन प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित कामांची ज्या जिल्हयात अंमलबजावणी करावयाची आहे त्या जिल्हयातील जिल्हाधिकारी हे कामे कार्यान्वीत करण्याबाबत पुढील कार्यवाही तात्काळ करतील.

**३.२.४** ज्या जिल्ह्यात कामे कार्यान्वीत होणार आहेत त्या जिल्हाधिकारी यांनी निधीचा हिशोब ठेवावा तसेच काम मंजूर करतांना सदरची कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करणेसाठी प्रचलित पध्दतीचा अवलंब करावा. सदर कामांबाबत संबंधीत जिल्हाधिकारी खर्चाचा मासिक प्रगती अहवाल संबंधीत नोडल जिल्हयाला सादर करतील.

**३.३** विधानमंडळ सदस्यांकडून शिफारशी प्राप्त झाल्यानंतर, जिल्हाधिकारी हे कामाची अनुज्ञेयता तपासून संबधित कार्यान्वयीन यंत्रणांकडून कामांच्या अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव मागवतील. कार्यान्वयीन यंत्रणेने शासनाच्या प्रचलित निकषानुसार तांत्रिकदृष्टया तपासणी करावी. त्यात काही अडचणी आल्यास किंवा काम करणे शक्य नसल्यास तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयाला कळवावे. अन्यथा ३० दिवसाच्या आत अंदाजपत्रकासह व तांत्रिक मान्यतेसह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

**३.४** जिल्हाधिकारी यांनी, कामांची अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेसह संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांकडून मिळाल्यानंतर, कामांना प्रशासकीय मंजूरी द्यावी व कामे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडे अंमलबजावणीसाठी सुपूर्द करावीत.

**३.५ <u>कामे मंजुर करण्याबाबत सूचना</u>**

बांधकाम प्रकारातील कामे केवळ शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जमिनीवर मंजूर करण्यात यावी. काम ज्या यंत्रणेस हस्तांतरीत करण्यात येणार आहे अशा यंत्रणेकडून काम पूर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती करण्यात येईल याबाबतचा दाखला **(परिशिष्ट क्र.३** मध्ये दर्शविल्यानुसार) अंमलबजावणी अधिकारी यांनी घ्यावा. सदर दाखला सादर केल्याशिवाय कामास मंजूरी देण्यात येऊ नये.

**३.६** विधीमंडळ सदस्यांनी प्रस्तावीत केलेल्या कामांना जिल्हाधिकारी हे अनुज्ञेय निधीच्या मर्यादेत मंजूरी देऊ शकतात. निधी वितरण करणेबाबतची कार्यवाही प्रकरण क्रमांक ४ मध्ये नमुद मार्गदर्शक सुचनांनुसार राहील.

**३.७** या कार्यक्रमातुन प्रस्तावित केलेल्या कामांना जनतेने सार्वजनिक वर्गणीतून जमा केलेल्या निधीचा वापर करता येऊ शकेल. जर विधीमंडळ सदस्यांनी मंजूर केलेली रक्कम ही अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी असेल आणि जास्तीची रक्कम लोकवर्गणी द्वारे प्राप्त होत असेल तर कामाला मंजुरी देता येईल. तथापि, लोकवर्गणीची रक्कम काम मंजुर करण्यापुर्वी जिल्हाधिकारी अथवा संबंधित यंत्रणा यांचेकडे जमा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात अंदाजपत्रकीय रकमेतून लोकवर्गणीव्दारे जमा झालेला निधी वजा करुन उर्वरित निधी, विधीमंडळ सदस्य या कार्यक्रमात अनुज्ञेय कामाच्या कमाल वित्तीय मर्यादेत मंजुर करु शकतील.

**३.८** विधीमंडळ सदस्यांनी त्यांचे अनुज्ञेय निधीपेक्षा जास्त रकमेच्या कामांची शिफारस केली असल्यास, <u>प्राधान्यक्रम देणे आवश्यक राहील. असा प्राधान्यक्रम दिला नसल्यास,</u> ज्या कामांचे अंदाजपत्रक प्रथम प्राप्त त्यास प्रथम मंजूरी हे तत्व अवलंबण्यात यावे.

**३.९** विधीमंडळ सदस्यांनी विहीत नमून्यात शिफारस केलेल्या अनुज्ञेय कामांना जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव प्राप्त झालेच्या तारखेपासून **<u>४५</u>** दिवसांच्या आत मंजूरी देण्यात यावी. सदर कामाच्या अंमलबजावणीत काही कारणास्तव अडचण असेल तर अशा वेळी सदर बाब जिल्हाधिकारी यांनी संबंधित विधीमंडळ सदस्यांना, **<u>३०</u>** दिवसांच्या आत योग्य कारणासह अवगत करावी. उपरोक्त बाबीसाठी निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आचार संहीतेचा कालावधी विचारात घेण्यात येऊ नये.

**३.१०** जिल्हाधिकारी यांनी कार्यान्वयीन यंत्रणेस दिलेल्या मंजूरी आदेशात काम विहीत वेळेत पूर्ण करणेसाठीचा कालावधी नमूद करावा. काम पूर्णत्वाचा कालावधी हा साधारणपणे १ वर्षापेक्षा अधिक राहणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत सदरचा कालावधी हा १ वर्षापेक्षा अधिक लागणार असल्यास, जास्तीचा कालावधी मंजूरी आदेशात योग्य कारणास्तव नमूद करावा. काम विहीत वेळेत पूर्ण न केल्यास कार्यान्वयीन यंत्रणेविरुध्द करावयाच्या कारवाईचा उल्लेख शासनाच्या प्रचलीत पध्दतीस अनुसरुन मंजूरी आदेशात नमूद करण्यात यावा. विधीमंडळ सदस्यांना सदर मंजूरी आदेशाची प्रत देण्यात यावी.

**३.११ <u>प्रशासकीय मान्यता</u>**

या योजने अंतर्गत कार्यक्षम/योग्य/सक्षम कार्यान्वयीन यंत्रणेकडून सदर कामांचे तांत्रिक मान्यतेसह आर्थिक अंदाजपत्रक तयार करुन घेऊन त्याला प्रशासकीय मंजुरी देण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. प्रशासकीय मान्यता व मंजूरी देण्याआधी जिल्हास्तरीय यंत्रणेने सदर कामाकरिताचे सर्व आवश्यक कागदपत्रे सक्षम

कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच सदरचे काम मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बसणे आवश्यक असेल. कार्यान्वयीन यंत्रणा ह्या शासनाच्या प्रचलीत नियमांनुसार कामांची अंमलबजावणी करतील. **कार्यान्वयीन यंत्रणेचे प्रशासकीय विभाग हे योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात उद्भवणाऱ्या प्रशासकीय / न्यायालयीन प्रकरणांसाठी जबाबदार राहतील.**

**३.१२** विधीमंडळ सदस्यांनी कामे प्रस्तावित केल्यानंतर आणि त्याला जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिल्यानंतर संबंधित विधीमंडळ सदस्यांच्या शिफारशीने ते काम रद्द करता येईल. तथापि, सदरचे काम सुरु झालेले नसावे आणि त्यावर कोणताही खर्च झालेला नसावा. याची निश्चिती जिल्हाधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरचे काम सुरु झाल्यानंतर / प्रगतीत असतांना थांबले असेल अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करुन, सदरची बाब संबंधित विधीमंडळ सदस्यांच्या निदर्शनास आणून, यासंदर्भात पुढील निर्णय घ्यावा.

कार्यकाल संपलेल्या विधीमंडळ सदस्यांच्या निधीतून मंजूर केलेली व अंमलबजावणी यंत्रणेने शिफारस केलेली कामे तांत्रिक कारणाशिवाय रद्द करता येणार नाहीत. सदर कामे रद्द केल्यास शिल्लक निधीतून नवीन कामे मंजूर न करता या कामावरील निधी शासनाकडे जमा करण्यात यावा.

विधीमंडळ सदस्याचा कार्यकाल संपल्यानंतर ते पुन्हा निवडून आले तरी संबंधित (नवनियुक्त) सदस्याला पूर्वीच्या कार्यकालातील मंजूर कामे कोणत्याही परिस्थितीत बदल /रद्द करता येणार नाहीत.

**३.१३** या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणारी कामे गतीमान पध्दतीने व्हावीत, यासाठी आवश्यकतेनुसार ई-निविदेची मर्यादा ₹ ३ लक्ष ऐवजी ₹ १० लक्ष इतकी वाढविण्यात येत आहे.

**३.१४** या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी कामे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत कार्यान्वित होत असताना, जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर, त्याच कामांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध समित्यांची पुन्हा मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र निविदा मागविण्याची विहित पध्दत, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमानुसार संबंधित समितीच्या अनुमतीने अंमलात आणावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात मुलभूत लोकोपयोगी ग्रामीण / नागरी सुविधा उपलब्ध होण्यासाठी लोकप्रतिनिधी त्यांचा निधी उपलब्ध करुन देत असतात. अशा निधीतून निर्माण होणारी मालमत्ता ही त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीची होणार असते व अशाप्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला एकप्रकारे चालना मिळत असते. तरी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत जी कामे प्रस्तावित करण्यात येतात, ती कामे तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने, त्या कामांसाठी आवश्यक असलेले हमीपत्र/ना हरकत प्रमाणपत्र स्थानिक स्वराज्य संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयास/कार्यान्वयीन यंत्रणांना त्वरीत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

**३.१५** एखाद्या अंमलबजावणी यंत्रणेला विशिष्ट काम करणे शक्य नसेल व त्याबद्दल त्यांनी तशी लेखी विनंती केल्यास, जिल्हाधिकारी सदर काम दुसऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेकडे सोपवू शकतील. एखादी अंमलबजावणी यंत्रणा अशी लेखी विनंती करु न शकल्यास, त्या यंत्रणेकडे काम सोपविल्यापासूनच्या तीन महिन्यांच्या कालावधीनंतर जिल्हाधिकारी सदर काम दुसऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेकडे सोपवू शकतील.

**३.१६ या कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेल्या कामांची यादी सोबतच्या परिशिष्ट- २ मध्ये दिली आहे. या परिशिष्टातील कामे वगळता या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रतिबंधित नसलेली अन्य सर्व कामे अनुज्ञेय राहतील.** खासदार स्थानिक क्षेत्र विकास

कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेली परंतू आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रतिबंधित केलेली कामांची यादी **परिशिष्ट क्र.२-अ** मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत. तसेच आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांमध्ये काही विशिष्ट स्वरूपाची अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या कामांची यादी **परिशिष्ट क्र.२-ब परिशिष्ट क्र.२-क व परिशिष्ट क्र.२-ड** मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

३.१७ <u>कमाल आर्थिक मर्यादा</u>

परिच्छेद क्र. ३.२१, ३.२३, ३.२७, ३.२८, ३.२९, ३.३०, ३.३३, ३.३४, ३.३५, ३.३६ व ३.३७ मध्ये विर्निदीष्टपणे नमूद केलेल्या बाबी वगळता **<u>एका कामासाठी कमाल २५ लक्ष च्या</u>** मर्यादेत कामांना प्रशासकीय मान्यता देता येईल.

**३.१८** या कार्यक्रमात हाती घेतलेली कामे वेळीच पुर्ण झाली नसल्यास अशा अपुर्ण कामांशी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा/अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. जिल्हाधिकारी अशा कामांवर मंजुर केल्यानुसार निधी खर्च झाल्याची खात्री करु शकतील. जेणे करुन कामांवरील खर्चाची द्विरुक्ती होणार नाही.

**३.१९.१** विधीमंडळ सदस्यांनी प्रस्तावीत केलेल्या कामात तसेच कामाच्या जागेत, संबंधित विधीमंडळ सदस्यांच्या शिफारशीशिवाय बदल करता येणार नाही. तथापि कामास प्रारंभ झाला असल्यास व सदर कामावर शासनाचा निधी खर्च झाला असल्यास तसेच कामात / कामाच्या जागेत बदल यामूळे आर्थिक जबाबदारी निर्माण होत असल्यास कामात किंवा कामाच्या जागेत बदल करण्यात येवू नये.

**३.१९.२** विधीमंडळ सदस्यांनी शिफारस केलेल्या कामाच्या अंमलबजावणीत काही कारणास्तव अडचण असेल तर अशा वेळी सदर बाब अंमलबजावणी अधिकारी यांनी संबंधित विधीमंडळ सदस्य व राज्य शासनास लवकरात लवकर किंवा ३० दिवसांच्या आत अवगत करावी.

**३.२०** विधीमंडळ सदस्यांनी सुचविल्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक/सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत, शासकीय रग्णालये, स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांची रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, नगरपालिका रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यकता असल्यास, रूग्णवाहीका व शववाहीका खरेदी करता येईल. खरेदी प्रक्रिया शासनाच्या प्रचलीत नियमांनुसार करावी.

**३.२१** या कार्यक्रमातुन मंजूर करण्यांत येणा-या प्रकल्पाची किंमत **₹ १ लक्ष** पेक्षा कमी असणार नाही. तथापि **₹ १ लक्ष** पेक्षा कमी किंमतीचे काम जिल्हाधिकारी यांच्या मते मोठया प्रमाणात जनतेकरीता उपयोगाचे आहे असे वाटत असल्यास ते काम मंजूर करता येईल. तसेच बांधकामाकरीता ज्या ठिकाणी टाईप प्लॅन असेल त्या ठिकाणी टाईप प्लॅन प्रमाणेच बांधकामे करावीत. त्यापेक्षा कमी किंमतीची कामे मंजूर करु नयेत.

**३.२२** जिल्हाधिकारी हे अनुसुचित जाती/जमाती क्षेत्रांसह आवश्यक असणा-या कामांची यादी (shelf of project) तयार करून विधीमंडळ सदस्यांना उपलब्ध करुन देतील. विधीमंडळ सदस्य स्थानिक जनतेच्या गरजेनुसार या यादीतील किंवा यादीत अंतर्भूत नसलेली कामे सुचवू शकतील.

३.२३ <u>दिव्यांगांकरीता (अंध, अपंग, मुकबधीर, कर्णबधीर, शारीरीक व मानसिक विकलांग) विशेष तरतुद</u>

**३.२३.१** या कार्यक्रमातुन दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी विधीमंडळ सदस्य प्रती वर्षी कमाल **₹ १०.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी प्रस्तावीत करु शकतील. अशा प्रकारची मदत फक्त पात्र व्यक्तींना, तीन चाकी सायकल (हाताद्वारे /

बॅटरीद्वारे चालणारी), मोटरद्वारे / बॅटरीद्वारे चालणा-या अथवा हस्तचलित चाकाच्या खुर्च्या आणि आर्टिफिशिअल लिंब्ज खरेदीकरीता दिली जाईल. एका विधीमंडळ सदस्याने या कार्यक्रमा अंतर्गत एखादया अपंग व्यक्तीला कृत्रिम अंग प्रस्तावित केले असल्यास व ते मंजूर झाले असल्यास दुसरे विधीमंडळ सदस्य त्याच व्यक्तीकरीता त्याच प्रयोजनाकरीता निधी प्रस्तावीत करु शकणार नाहीत. लगतच्या दोन वर्षात संबंधित लाभार्थ्याने प्रस्तावित प्रयोजनासाठी अन्य कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेला नसावा. लाभार्थ्याची पात्रता व साहित्याची खरेदी प्रक्रीया जिल्हा शल्य चिकित्सक/सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विहित कार्यपध्दतीने करण्यात यावी. तसेच एका व्यक्तीसाठी एकापेक्षा जास्त सदस्यांचा निधी प्रस्तावित करुन एकुण निधी मंजूर करणे अनुज्ञेय राहणार नाही. यामधे आवर्ती प्रकारचा खर्च अनुज्ञेय नाही, रोख स्वरूपात अनुदान देणे अनुज्ञेय नाही. यासाठी वैयक्तिक लाभाची मर्यादा **₹ १५,०००/-** राहील. उपकरणे प्राप्त झाल्यानंतर पात्र विविध दिव्यांग व्यंक्तींना शक्यतो सार्वजनिक कार्यक्रमात वाटप करण्यात यावे. असे कार्यक्रम वर्षातून एकदा अथवा दोन वेळा आयोजित करण्यात यावेत.

**३.२३.२** राज्य शासनाच्या/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व अनुदानित शिक्षण संस्थांच्या, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या (प्राथमिक, माध्यमिक) शाळांच्या वर्गखोल्या, संगणक खोल्या, स्वच्छतागृहे, संरक्षण भिंत, खुले रंगमंच बांधणे ही कामे **₹ २०.०० लक्ष** च्या मर्यादेत अनुज्ञेय राहतील.

**३.२३.३** राज्य शासनाच्या/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व अनुदानित शिक्षण संस्थांच्या, दिव्यांग शाळांसाठी संगणक व अनुषंगिक उपकरणे, शैक्षणिक आज्ञावल्या खरेदी करणे, इलेक्ट्रॉनिक अध्यापन साहित्य, दृक श्राव्य सुविधा पुरविणारी उपकरणे इ.कामे **₹ १०.०० लक्ष** च्या अनुज्ञेय राहतील. याबाबत सामाजिक न्याय/शालेय शिक्षण विभागाने धोरण ठरवून त्यामध्ये समाविष्ट अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक आज्ञावल्या उपलब्ध करून देता येऊ शकतील. शालेय शिक्षण विभागाच्या व माहिती तंत्रज्ञान विभागाने शिफारस केल्यानुसार ई-लर्निंग साहित्याची खरेदी करणे अनुज्ञेय राहील. एका संस्थेसाठी एका वर्षात जास्तीत जास्त **₹ १०.०० लक्ष** मर्यादेत कामे विधीमंडळ सदस्य प्रस्तावित करु शकतील.

## ३.२४ <u>नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयाकरीता पुस्तके व इतर साहित्य</u>

या कार्यक्रमाअंतर्गत, नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयाकरीता पुस्तके, संगणक,एलसीडी प्रोजेक्टर, पुस्तके ठेवण्यासाठी रॅक, कपाटे पुरविण्याकरीता निधी मंजूर करता येईल. तथापि, सदरचा निधी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० अन्वये ग्रंथालय संचालनालयाकडून संबंधित ग्रंथालयास देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या मर्यादेत असेल. तसेच एका ग्रंथालयासाठी एका आर्थिक वर्षात एकदाच निधी वापरता येईल.

## ३.२५ <u>अपारंपारीक उर्जा साधनाच्या प्रकल्पाची आस्थापना करणे:-</u>

हा प्रकल्प सार्वजनिक ठिकाणी आणि जनतेच्या/समाजाच्या उपयोगाचा असून या प्रकारच्या प्रकल्पातुन सार्वजनिक मालमत्ता निर्माण होईल व ती जनतेच्या हिताची असून सौर ऊर्जेला चालना देणारा प्रकल्प असेल. अशी कामे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या इमारती, दवाखाने, शाळा, बगीचे, पदपथ व शासकीय इमारती अशा सार्वजनिक ठिकाणी करावीत. ही कामे महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांच्या दरकरारानुसार करावीत व वरीलपैकी ज्यांचेसाठी प्रकल्प मंजूर झाला असेल ती संस्था सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचे काम व प्रकल्प कार्यान्वीत ठेवण्यासाठी जबाबदार राहतील.

**३.२६** सीमा क्षेत्रात समुद्रकिनारा आणि पर्यावरणीय संवेदनशील भागात या कार्यक्रमाअंतर्गत कामे मंजुर करण्यापुर्वी संबंधित प्रशासकीय विभाग व यंत्रणेची परवानगी घेण्यांत यावी.

## ३.२७ क्रीडा क्षेत्र

**३.२७.१** स्थानिक क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा मंडळ, क्रीडा संस्था यांनी एकविध संघटनेच्या मान्यतेने आयोजित केल्या जाणाऱ्या निमंत्रित जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धेसाठी, एका स्पर्धेकरीता जास्तीत जास्त **₹५.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी देता येईल.

**३.२७.२** जिल्हा क्रीडा स्पर्धांसाठी, एका स्पर्धेकरीता (एकविध संघटनेव्दारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) जास्तीत जास्त **₹५.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी देता येईल.

**३.२७.३** राज्य क्रीडा स्पर्धांसाठी (एकविध संघटनेव्दारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धांसाठी) एका स्पर्धेकरीता जास्तीत जास्त **₹१०.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी देता येईल.

**३.२७.४** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी (एकविध संघटनेव्दारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) एका स्पर्धेकरीता जास्तीत जास्त **₹१२.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी देता येईल.

**३.२७.५** आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी (एकविध संघटनेव्दारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) एका स्पर्धेकरीता जास्तीत जास्त **₹१५.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी देता येईल.

**३.२७.६** राज्याच्या क्रीडा संचालयालयाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय खेळाडुंना वैयक्तिक क्रीडा साहित्य खरेदी करता **₹१.०० लक्ष** च्या मर्यादेत लाभ देता येईल.

**३.२७.७** नोंदणीकृत क्रीडा मंडळांना क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी **₹५.०० लक्ष** च्या मर्यादेत निधी उपलब्ध करुन देता येईल.

## ३.२८ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अथवा शासकीय जागेवर व्यायाम शाळा व अन्य कामे करण्याकरीता खालील अटींच्या अधीन निधी मंजूर करता येईलः-

**३.२८.१** अस्तित्वातील व्यायाम शाळांसाठी शौचालय, कुंपण भिंती स्वतंत्रपणे घेता येतील.

**३.२८.२** बांधकाम आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या/क्रीडा विभागाच्या प्रमाणकानुसार असावेत.

**३.२८.३** ज्या ठिकाणी कूंपण व भिंती किंवा कुंपण घ्यावयाचे आहे ते पूर्वी कोणत्याही योजनेतून झालेले नसावे.

**३.२८.४** व्यायामशाळेसाठी **₹ १०.०० लक्ष** इतक्या आर्थिक मर्यादेत, अत्यावश्यक अन्य सुविधा (उदा.व्यायाम साहित्य, इ.) पुरविण्याचे प्रस्तावित असेल तेथेच व्यायामशाळेचे बांधकाम करण्यात यावे.

**३.२८.५** फक्त हॉल किंवा अन्य सुविधा पुरविण्यासाठी व्यायामशाळेच्या नावाखाली बांधकाम करता येणार नाही, याची खात्री करण्यात यावी.

**३.२८.६** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रिक्त इमारतीत किंवा समाजभवनाचे इमारतीत व्यायामशाळेचे स्थानांतरण होत असल्यास व यामध्ये जमिनीची मालकी शासनाची असल्यास, तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने तसा ठराव संमत केल्यास, त्या इमारतीमधील व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करता येतील.

## ३.२९ बार असोशिएशनच्या ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणेः-

राज्यातील जिल्हा न्यायालय, तालुकास्तरीय न्यायालये, जिल्हास्तरीय न्यायालये व उच्च न्यायालय यांच्या बार असोशिएशनच्या असलेल्या ग्रंथालयासाठी, संगणक व पुस्तकांच्या खरेदीसाठी विधीमंडळ सदस्य वर्षातुन एकदाच जास्तीत जास्त **₹५०,०००/-** (अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त) रकमेची शिफारस करु शकतील. तथापि, उच्च न्यायालयाच्या बार कॉन्सिल लायब्ररीसाठी प्रतिवर्षी **₹२.००** लाख मर्यादा अनुज्ञेय राहील. एका बार असोशिएशनला पाच वर्षातुन एकदाच ही रक्कम अनुज्ञेय राहील. ज्या जिल्हा न्यायालय, तालुकास्तरीय न्यायालये, जिल्हास्तरीय न्यायालये

व उच्च न्यायालय यांच्या वकील संघासाठी असलेल्या वाचनालयाकरीता इतर कोणत्याही योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे त्या वाचनालयासाठी या कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

**३.३० महानगरपालिका व "अ " वर्ग नगरपालिका क्षेत्रातील विशेष दुरुस्तीची कामे :-**

**३.३०.१** महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रातील पालिकांच्या मालकीच्या तसेच उपकर प्राप्त इमारती (सेस्ड बिल्डींग), शासकीय मालकीच्या बीडीडी चाळी व बीआयटी चाळी या इमारतीमधील गल्ल्या, गटारे, सार्वजनीक स्वच्छतागृहे बांधणे व त्यांची दुरुस्ती करणे, दुरुस्त न होणाऱ्या शौचालयांची पुनर्बांधणी, सार्वजनिक जिने, पॅसेज व व्हरांडे यांची दुरुस्ती करणे व पेयजलाकरीता आवश्यक दुरुस्तीची कामे करणे अनुज्ञेय राहील. दुरुस्तीच्या एका कामासाठी **₹ १५.०० लक्ष** कमाल मर्यादा राहील.

**३.३०.२** महानगरपालिका व "अ " वर्ग नगरपालिका क्षेत्रातील खाजगी जागांवर गलिच्छ वस्त्यात सार्वजनिक उपयोगाच्या बालवाड्या, व्यायाम शाळा बांधणे अनुज्ञेय राहील.

**३.३०.३** महानगरपालिकेच्या व "अ " वर्ग नगरपालिका अथवा शासकीय मालकीच्या आयुर्मान संपलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे, बृहन्मुंबईमध्ये "अ " वर्गीय उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्तीची कामे, शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य सस्थांच्या मालकीच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा खोल्यांची दुरुस्ती, गलिच्छ, दलित वस्त्यांमधील समाजमंदीरांची विशेष दुरुस्ती ही कामे अनुज्ञेय राहतील. दुरुस्तीच्या एका कामासाठी **₹ १५.०० लक्ष** कमाल मर्यादा राहील.

**३.३०.४** पेयजलाकरीता विशेष दुरुस्तीची कामे(एका कामासाठी मर्यादा **₹ १५.०० लक्ष**) सदरील काम महानगरपालिका/ नगरपालिकांबरोबरच इतर नागरी व ग्रामीण भागांतही अनुज्ञेय राहील.

**३.३१ जलयुक्त शिवार योजना:-** जलयुक्त शिवार योजनेत अंतर्भूत गावांकरीता, या कार्यक्रमांमधून अनुज्ञेय असलेल्या कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, लघुपाटबंधारे योजना, वळण बंधारे, वनराई बंधारे आणि अन्य सर्व प्रकारच्या कामांच्या नवीन कामांबरोबर या सर्व कामांसाठी "देखभाल व दुरूस्ती" या बाबींवरही सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीसाठी खर्च करण्याची मुभा राहील.

**३.३२ आमदार आदर्श ग्राम योजना:-** आमदार आदर्श ग्राम योजनेत, विधीमंडळ सदस्यांनी निवडलेल्या गावांत, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, अनुज्ञेय कामे घेता येतील. या योजनेत विधानसभा सदस्य आपल्या मतदारसंघातील ग्रामपंचायत निवडतील. विधानपरिषद सदस्य त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही जिल्हयातून ग्रामपंचायतीची निवड करु शकतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ शहरी आणि ग्रामीण भागात विभागला गेला असेल तर ते मतदारसंघाच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायतीची निवड करतील. विधानसभा सदस्यांचा मतदारसंघ जर संपूर्णपणे शहरी असेल तर त्यांच्या सोयीच्या दृष्टीने त्याच जिल्हातील एका ग्रामपंचायतीची निवड ते करु शकतील. तसेच मुंबई परिसरातील शहरी मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीची निवड करु शकतील व त्यांनी निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये सुचविलेल्या कामांसाठी यथास्थिती, जिल्हाधिकारी, मुंबई शहर / जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, हे नोडल जिल्हाधिकारी राहतील व ते काम सुचविण्यात आलेल्या संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना निधी वितरीत करतील. या प्रयोजनासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेल्या निधी वितरणाची व खर्च करण्याची कार्यपध्दती प्रकरण क्र. ४ मधील सूचनांनुसार राहील.

**३.३३ स्मशानभूमी/कब्रस्थानाची कामे:-** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जागेत तसेच वक्फ बोर्डाच्या जागेवर, सदरची कामे ग्राम विकास /नगर विकास विभागाच्या प्रमाणकानुसार करण्यात यावीत. लोकांना थांबण्यासाठी शेडस् बांधणे, लोकांना बसण्यासाठी बाकडी टाकणे, हातपाय धुण्यासाठी पाणी पुरवठयाची सोय करणे, आवश्यकतेप्रमाणे प्रेताच्या

दहनासाठी स्टॅण्ड बांधणे, संरक्षण भिंत बांधणे, अंतर्गत पेव्हर ब्लॉक्स बसविणे/फरशी बसविणे /कॉंक्रिटीकरण तसेच घाट बांधणे, या सर्व कामांसाठी एकत्रितपणे **₹ १५.०० लक्ष च्या** मर्यादेत निधी खर्च करता येईल.

**३.३४ माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र**

**३.३४.१** विधानमंडळ सदस्यांसाठी त्यांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता त्यांच्या मागणीनुसार एक लॅपटॉप, एक डेस्कटॉप संगणक, एक i-pad व एक प्रिंटर कम स्कॅनर अनुज्ञेय राहील. ही खरेदी सदस्यास ५ वर्षातून एकदाच करता येईल. यासाठी कमाल वित्तीय मर्यादा **₹ ३.५० लक्ष** राहील.

**३.३४.२** शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये यांचेसाठी शासकीय कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी संगणक व अनुषंगिक साहित्य, सॉफ्टवेअर्स ची खरेदी अनुज्ञेय आहे. ही खरेदी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात यावी.

**३.३५ शिक्षण क्षेत्र**

**३.३५.१** राज्य शासन ,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासन अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळा, आश्रम शाळा व महाविद्यालये यांना ग्रंथालयांसाठी पुस्तके खरेदी करण्याकरीता प्रती संस्था **₹ २.०० लक्ष** च्या रकमेच्या मर्यादेत निधी मंजूर करता येईल.

**३.३५.२** शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शांळा, आश्रम शाळा (प्राथमिक, माध्यमिक) या शाळांच्या वर्ग खोल्या, संगणक खोल्या, स्वच्छता गृहे, संरक्षण भिंत,खुले रंगमंच बांधणे इ.कामे **₹ १५.००लक्ष** च्या मर्यादेत अनुज्ञेय राहील.

**३.३५.३** शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांच्या प्रभावी वापरासाठी, केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या, शासन अनुदानीत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, आश्रम शाळा, अनुदानीत शिक्षण संस्थांकरीता (प्राथमिक, माध्यमिक, तंत्र शिक्षण संस्था तसेच अंगणवाडी साठी संगणक व अनुषंगीक उपकरणे, शैक्षणिक आज्ञावल्या खरेदी करणे, इलेक्ट्रॉनिक अध्यापन साहित्य ) दृक श्राव्य सुविधा पुरविणारे उपकरण पुरविणे अनुज्ञेय राहील. याबाबत शालेय शिक्षण विभागाने धोरण ठरवून त्यामध्ये समाविष्ट अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक आज्ञावल्या विहीत करणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण विभागाच्या व माहिती तंत्रज्ञान विभागांनी शिफारस केल्यानुसार शैक्षणिक आज्ञावल्या, ई-लर्निंग इ. साहित्याची खरेदी करणे अनुज्ञेय राहील. एका संस्थेसाठी एका वर्षात जास्तीत जास्त **₹५ लक्ष** च्या मर्यादेत कामे विधीमंडळ सदस्य प्रस्तावित करु शकतील.

**३.३६ विज्ञान केंद्र**

ज्या ठिकाणी शासनाने विज्ञान केंद्राची उभारणी केलेली आहे अशा विज्ञान केंद्रासाठी नवीन शोध साहित्य स्थापित करण्यासाठी एका वर्षात **₹ २.०० लक्ष** पर्यंत निधी खर्च करणे अनुज्ञेय राहील. ही खरेदी शालेय शिक्षण/उच्च शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी.

**३.३७ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जागेवर सामाजिक/सांस्कृतिक सभागृह, सभामंडप, खुले सभागृहांची बांधकामे** खालील अटी व शर्तीच्या आधारे अनुज्ञेय असतील:-

१) १००० पेक्षा कमी लोकसंख्येकरिता सामाजिक सभागृह/ सांस्कृतिक सभागृह/ सभामंडप यापैकी- **३**

२) १००० ते ५००० लोकसंख्येकरिता सामाजिक सभागृह/ सांस्कृतिक सभागृह/ सभामंडप यापैकी- **६**

३) ५००० ते १०००० लोकसंख्येकरिता सामाजिक सभागृह/ सांस्कृतिक सभागृह/ सभामंडप यापैकी- **९**

४) १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांसाठी सामाजिक सभागृह/ सांस्कृतिक सभागृह/ सभामंडप यापैकी- **१२**

५) शहरी भागात प्रत्येक वॉर्डमध्ये सामाजिक सभागृह/सांस्कृतिक सभागृह/सभामंडप यापैकी- **६**
६) सभागृह/सभामंडप यासाठी **किमान आर्थिक मर्यादा ₹७.०० लक्ष** राहील.
७) सामाजिक सभागृह मंजूर करताना यापूर्वी अन्य योजनांतून बांधण्यात आलेली सभागृहे विचारात घेऊन वरील निकषांच्या मर्यादेत नवीन सभागृह मंजूर करावे.
८) सदरचे बांधकाम हे कोणत्याही पूर्वीच्या बांधकामास जोडता येणार नाही व ते स्वतंत्र बांधकाम असेल.
९) यास पक्के छत असावे (पत्रा अथवा अनुषंगिक बाबी वगळून) या कामाकरीता गाव, वाडी, वस्त्या व पाडे स्वतंत्र समजण्यात यावे. तसेच वाडी, वस्त्या व पाडे अधिसूचित असावेत.
१०) सामाजिक सभागृह मंजूर करताना यापूर्वी अन्य योजनातून बांधण्यात आलेली सभागृहे विचारात घेऊन नविन सभागृह मंजूर करावे.
११) अस्तित्वातील, कोणत्याही योजनेतून बांधलेल्या, सभागृहांसाठी शौचालय, कुंपण भिंती स्वतंत्रपणे घेता येईल. ते पूर्वी कोणत्याही योजनेतून झालेले नसावे. काम दुरुस्तीचे नसावे.
१२) बांधकाम आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानुसार असावेत.
१३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सामाजिक सभागृहाच्या बांधकामासाठी लहान/मोठया आकाराचे टाईप डिझाईन तयार करुन घ्यावे.

**३.३८ <u>संबंधित प्रशासकीय विभागाच्या आर्थिक मर्यादा,अटी व शर्ती लागू रहाणे:-</u>** या कार्यक्रमांतर्गत कामे करताना ती कामे ज्या प्रशासकीय विभागाच्या कार्यकक्षेत असतील त्या विभागाने विहित केलेली धोरणे, आर्थिक मर्यादा, अटी व शर्ती विचारात घेऊन किमान आर्थिक मर्यादेत काम करणे व आवश्यक परवानगी /मंजूरी घेणे अनिवार्य राहील.

**३.३९ <u>विशेष बाबींची प्रकरणे:-</u>** सदर कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेल्या किंवा विहित आर्थिक मर्यादेपेक्षा अधिक खर्चाच्या बाबी “विशेष बाब” म्हणून मान्य करण्यास्तव जिल्हाधिकारी स्तरावरुन शासनास प्रस्ताव सादर केले जातात. सदर विशेष बाबी साठी प्रस्तावित कामापासून होणारे फायदे, प्रस्ताव मान्य केल्यास व शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्यास त्याबाबतचे सविस्तर विवेचन व स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करून **शासकीय मालमत्ता निर्माण करण्याच्या अटीस अधीन राहून,** प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावेत. अशा विशेष प्रकरणात, या कार्यक्रमांतर्गत असलेल्या अटी व शर्ती शिथिल करून "विशेष बाब" म्हणून मंजूरी देण्याचे अधिकार नियोजन विभागाचे प्रभारी मंत्री महोदयाना राहतील.

**३.४० <u>इतर विभागांनी निर्गमित केलेले शासन निर्णय/शासन परिपत्रक:-</u> आमदार स्थानिक विकास कार्यक्रम नियोजन विभागाच्या अखत्यारित येत असल्याने याबाबत इतर कोणत्याही विभागाने शासन निर्णय/शासन परिपत्रक निर्गमित करण्यापूर्वी नियोजन विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. त्या अनुषंगाने नियोजन विभागाने स्वतंत्रपणे शासन निर्णय/शासन परिपत्रक निर्गमित करेपर्यंत, इतर कोणत्याही विभागाने दिलेले आदेश/सूचना या कार्यक्रमासाठी लागू राहणार नाहीत.**

## ४. निधी वितरण व व्यवस्थापन

४ .१ या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेला निधी हा त्या आर्थिक वर्षाकरीताच अनुज्ञेय राहील. सदर निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना लागू राहतील.

४ .२ प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी अनुज्ञेय असलेला निधी अर्थसंकल्पित करून संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे वितरित करण्यात येईल. तसेच विधानपरिषद सदस्यांना अनुज्ञेय असलेला निधी त्यांनी घोषित केलेल्या नोडल जिल्हाधिकाऱ्यांकडे वितरित करण्यात येईल. या कार्यक्रमांसाठी निधी खालील **लेखाशीर्षांतर्गत** अर्थसंकल्पित, वितरित व खर्च करण्यात येईल :-

**" मागणी क्रमांक ओ-१०**
**४५१५- इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च**
**१०२ सामुहिक विकास**
**पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना**
**(१) बहुउद्देशीय कार्यक्रम**
**(००)(०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम**
**(४५१५ ००१२) (योजनांतर्गत) (दत्तमत) ५३ मोठी बांधकामे**

४.३ विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या आर्थिक वर्षातील कार्यकालाकरीता खालीलप्रमाणे निधी अनुज्ञेय असेल:-

| आर्थिक वर्षातील कालावधी | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|
| ० ते ३ महिने | निरंक |
| ३ ते ९ महिने | अनुज्ञेय निधीच्या ५०% |
| ९ ते १२ महिने | अनुज्ञेय निधीच्या १००% |

४.४ विहित कार्यकालाची समाप्ती, राजीनामा, निलंबन, मृत्यु किंवा अन्य कोणत्याही कारणाने, आमदार महोदयांचा कार्यकाल समाप्त होत असल्यास, त्यांच्या कार्यकालाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत, त्यांनी सुचविलेल्या कामांपैकी, प्रशासकीय मंजूरी झालेल्या कामांना, वरील **परिच्छेद क्र. ४.३** मधील तरतुद विचारात न घेता, आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

४.५ कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर सदर काम सुरु होण्यासाठी ५०% निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा. उर्वरित निधी कार्यान्वयीन यंत्रणेने पहिल्या हप्त्यातील ७०% रक्कम खर्च झाल्याचे प्रमाणित केल्यानंतर वितरीत करण्यात यावा. अपवादात्मक परिस्थितीत जसे एक लक्ष पेक्षा कमी किंमतीची कामे अथवा खरेदीची कामे यासाठी १००% निधी यंत्रणेकडे सुपूर्द करता येईल.

४.६ बांधकाम प्रकारातील कामांच्या संदर्भात काम सुरु होण्यापूर्वी, काम प्रगतीत असताना आणि काम पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे काम पूर्णत्वाच्या दाखल्या सोबत कार्यान्वयीन यंत्रणेने सादर करणे आवश्यक राहील.

## ५. सनियंत्रण

**५.१** योजनेअंतर्गत काम पूर्ण झाल्यानंतर सदर काम/वास्तु तात्काळ जनतेच्या उपयोगासाठी खुली करण्यांत येवुन लोकार्पित करण्यात यावी. जनतेच्या माहितीकरीता, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधीमंडळ सदस्यांच्या निधीतून मंजूर करण्यांत आलेली कामे पूर्ण झाल्यावर कामांच्या दर्शनी भागावर कोनशिला /स्थायी स्वरुपात फलक लावण्यांत यावा. कामे बांधकाम स्वरुपाची नसतील तेव्हा शक्य असल्यास लाकडी किंवा तत्सम फलक लावावा. फलकाचा नमुना **परिशिष्ट क्र.-४** मध्ये दिलेला आहे.

**५.२** या कार्यक्रमातुन पूर्ण करण्यांत आलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या कामांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयात ठेवण्यांत यावी आणि सर्वसामान्य जनतेकरीता कामांची माहिती वेबसाईट वर देण्यांत यावी. यासाठी नमुन्यादाखल दिलेल्या **परिशिष्ट क्र.८** मध्ये नमूद संकेतांकाचा वापर करण्यात यावा.

**५.३** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधिल तरतूदीनुसार व त्यामध्ये नमुद केलेल्या नियमावलीनुसार सर्व नागरिकांना, विधीमंडळ सदस्यांना या कार्यक्रमाच्या कोणत्याही बाबीची तसेच विधीमंडळ सदस्यांनी प्रस्तावीत केलेल्या/मंजूर/पूर्ण झालेल्या कामाची माहिती घेण्याचा अधिकार राहील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही सर्व माहिती पूरविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

**कामांची तपासणी**

**५.४** जिल्हाधिकारी यांनी या योजनेअंतर्गतच्या कामांचे संनियंत्रण करावयाचे आहे. तसेच कामे विहित वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करावयाच्या आहेत. जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाशी प्रामुख्याने संबंधित असलेल्या जिल्हा स्तरावरील २ किंवा ३ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले पथक जिल्हाधिकारी यांनी निर्माण करावे. या पथकाने आधीच्या वर्षात या कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेल्या कामांपैकी किमान १५ ते २० कामे रॅन्डम सॅम्पलिंग पध्दतीने निवडून त्या कामांची नमुना पाहणी प्रत्यक्ष भेटीव्दारे दर तीन महिन्यात करावी. कामे निवडताना त्यातील काही कामे आदिवासी/दुर्गम भागातील असतील याची दक्षता घ्यावी. कामे मंजूरीप्रमाणे नियोजित ठिकाणी पूर्ण करण्यात आली किंवा कसे व त्याचा उपयोग अपेक्षेप्रमाणे केला जातो किंवा नाही याबाबत **परिशिष्ट क्र-५** नुसार अहवाल या समितीने जिल्हाधिकारी यांना सादर करावा. जर काही त्रुटी निदर्शनास आल्या तर त्या जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन दूर कराव्यात. आवश्यकता असल्यास विभागीय आयुक्तांचे व यथास्थिती शासनाचे मार्गदर्शन घ्यावे.

**५.५** जिल्हाधिकारी यांनी तपासणी कामाचा अहवाल पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांच्या वतीने उप आयुक्त (नियोजन), यांनी दरवर्षी एकदा तरी नोंदवहयांची/संगणकीय नोंदवहयांची पडताळणी करुन या नोंदवहया अद्ययावत ठेवल्या जातात किंवा नाही याची पाहणी करावी. त्यांनी, ज्या कामांच्या बाबतीत कामे पूर्ण झाल्याचे दाखले मिळाले नसतील, त्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयांकडे पाठपुरावा करुन ते मिळविण्यात येतील याची दक्षता घ्यावी. उप आयुक्त (नियोजन) यांनी तीन महिन्यांतून एकदा या कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेल्या कामांपैकी किमान १५ ते २० कामे रॅन्डम सॅम्पलिंग पध्दतीने निवडून त्या कामांची नमुना पाहणी प्रत्यक्ष भेटीव्दारे करावी व जिल्हाधिकारी यांच्याकडील त्रैमासिक अहवाल व आपल्या स्तरावरील त्रैमासिक अहवाल शासनास सादर करावा.

**५.६** नियोजन विभागातील सह सचिव/उप सचिव यांनी जिल्हा दौरा केल्यास अथवा क्षेत्रीय भेटी दिल्यास या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांची रॅन्डम सॅम्पलिंग पध्दतीने तपासणी करावी व त्याचा अहवाल प्रभारी सचिव, नियोजन यांना सादर करावा.

**कामांचे तपासणी अहवाल**

**५.७** या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचे अहवाल संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी जिल्हाधिकारी यांना दरमहा ५ तारखेपर्यंत सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी एकत्रित अहवाल विहित प्रपत्रात, विभागीय आयुक्तांना दरमहा १० तारखेपूर्वी सादर करावेत. विभागीय आयुक्तांनी विभागाचा एकत्रित अहवाल शासनास दरमहा १५ तारखेपूर्वी सादर करावा. या कार्यक्रमांतर्गत होण्याऱ्या खर्चाची माहिती जिल्हाधिकारी यांनी दरमहा १० तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांकडे पाठवावी व विभागीय आयुक्तांनी विभागाच्या खर्चाचा एकत्रित त्रैमासिक अहवाल **परिशिष्ट क्र-६** नुसार शासनास सादर करावा.

**५.८** निधी अर्थसंकल्पित करणे व वितरित करणे ही बाब वगळता **विधानमंडळाशी संबंधित विविध बाबी, विधीमंडळात उपस्थित होणारे प्रश्न, आश्वासने, निधी अखर्चित राहणे, महालेखापाल कार्यालयाकडील लेखापरिक्षणात उपस्थित होणारे मुद्दे,कार्यान्वयीन यंत्रणांच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या तक्रारी इ. बाबी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रशासकीय विभागांनी हाताळावयाच्या आहेत.**

**खर्च ताळमेळ**

**५.९** या कार्यक्रमाशी संबंधित सर्व लेखा विषयक बाबी जसे, दर तिमाहीतील खर्चाचा तसेच वार्षिक खर्चाचा ताळमेळ, संगणक प्रणालीद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणांना वाटप, निधीच्या खर्चाची शासनास सादर करण्यात येणारी माहिती व निधी समर्पण, यासंदर्भातील वित्त विभागाच्या व महालेखापाल यांच्याकडील वेळोवेळीच्या निर्देशांनुसार, संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित कार्यालयीन यंत्रणांनी आहरीत केलेल्या निधीचा online खर्चाचा ताळमेळ केल्याबाबतची खात्री करून त्याबाबतचा दर तिमाहीचा अहवाल **परिशिष्ट क्र - ७** मध्ये दिलेल्या विहित मुदतीत विभागीय आयुक्त यांना सादर करावा.

**________**___**___**_______**

## परिशिष्ट क्र.१

## आमदारांनी अनुज्ञेय कामाच्या शिफारशी करण्यासाठी नमुना

(सदर शिफारशी आमदारांच्या लेटरहेडवर असाव्यात)

दिनांक:

प्रति,
जिल्हाधिकारी,

विषय :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामाच्या शिफारशी करणेबाबत.

महोदय,

माझ्या (वि.स. मतदारसंघ/कार्यक्षेत्र) मतदारसंघासाठी प्राप्त आ.स्था.वि. कार्यक्रमाच्या निधीमधून खालील कामे मी प्रस्तावित करीत आहे. सदरील कामांची आराखडे, अंदाजपत्रके त्वरीत मागवून व छाननी करून कामांना कृपया मंजूरी द्यावी.

| प्राधान्य क्रम | कामाचे स्वरुप सेक्टर व कामाचा संकेतांक | ठिकाण | अंदाजित किंमत (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| . | | | |
| .. | | | |
| .. | | | |
| ... | | | |

२. उपरोक्त कामांपैकी प्राधान्य क्रमातील क्र. येथील कामे ही, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या कल्याणाची प्राबल्य असलेल्या भागाच्या विकासाची आहेत. तेव्हा आ.स्था.वि. कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांतील विहित कार्यपध्दती नुसार योग्य कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

(आमदारांची स्वाक्षरी)

## परिशिष्ट क्र.२

**या कार्यक्रमा अंतर्गत प्रतिबंधित कामे/बाबी –**

१. केंद्र, राज्य सरकारे, त्यांच्या विभाग, सरकारी संस्था / संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, यांची कार्यालये व निवासी इमारती. (तथापि व्यायाम शाळा, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात प्रतिक्षा गृह/स्वच्छतागृहे, तलाठी कार्यालय बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम अनुज्ञेय राहील.)

२. खाजगी आणि व्यावसायिक संस्था यांची कार्यालये, त्यांच्या निवासी इमारतीची बांधकामे.

३. परिच्छेद क्र. ३.३० व ३.३१ मधील दुरुस्तीची कामे वगळुन इतर कोणत्याही प्रकारची दुरुस्ती, देखभाल व दुरुस्तीची अथवा नुतनीकरणाची कामे.

४. कोणत्याही प्रकारचे अनुदान, कर्ज, वर्गणी, मदत निधी (परिच्छेद क्र.३.२७ मधील बाब वगळता) व प्रतिपूर्ती, इतर वैयक्तिक / कुटुंब लाभ. (परिच्छेद क्र.३.२३ मध्ये निर्देशित बाबी वगळुन)

५. या कार्यक्रमांतर्गत निर्माण झालेली मालमत्ता कोणत्याही व्यक्तीच्या नावे करणे.

६. परिच्छेद क्र.३.२३,३.२४,३.२५, ३.२७, ३.२८, ३.२९, ३.३४ व ३.३५ मध्ये नमुद साहित्य, वस्तु वगळता इतर जंगम वस्तुंची खरेदी.

७. जमीन संपादन किंवा विकत घेतलेल्या जमीनीची भरपाई.

८. चल बाबींचे प्रकल्प (पोकलेन,जेसीबी,घंटागाडी,कचरागाडी,वॉटर टँकर,सार्वजनिक वाहतूकीसाठी बस, रूग्णवाहीका/ शववाहिका वगळून)

९. कोणताही आवर्ती खर्च.

१०. धार्मिक प्रार्थनास्थळांच्या आत किंवा धार्मिक कार्य करणा-या संस्थांच्या मालकीच्या जागेवर बांधकाम (तथापि, धार्मिक श्रद्धास्थान असलेल्या ठिकाणी दफन / दहन करण्यासाठी आवश्यक त्या सोई सुविधांची निर्मीती कार्यक्रमातुन अनुज्ञेय आहे.)

११. स्वागत कमानी,स्मारके,पुतळे.

१२. वैयक्तिक/खासगी मालकीच्या/ खासगी संस्थाच्या जमिनीवरील कामे. (वक्फ बोर्डाच्या जागेवरील स्मशानभूमी/कब्रस्थानाची कामे वगळून )

१३. अन्य कोणत्याही योजनेसाठी कमी पडणारी पूरक तरतूद.

१४. एखादया मोठया कामांचे भाग करून टप्प्यांमध्ये मंजूर करणे.

१५. एका कामाकरीता एकापेक्षा जास्त विधानमंडळ सदस्यांचे निधी एकत्रीकरण.

१६. राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तथा प्रमुख जिल्हा मार्गांची कामे.

---*--*---

## परिशिष्ट क्र.२-अ

**खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली खालील कामे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये घेता येणार नाहीत:-**

| अ क्र. | कामाचे वर्णन | खा.स्था.क्षे.वि.का. दि.१५.५.२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमधील संदर्भ |
|---|---|---|
| १. | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय असलेली खाजगी / नोंदणीकृत विश्वस्थ संस्था, सहकारी संस्थांची कामे. | परिच्छेद ३.२१ व ३.४२ |
| २. | कोणत्याही प्रकारचा प्रशासकीय खर्च | परिच्छेद ४.१७ |
| ३. | शासन अनुदानित शाळांचे बांधकाम | परिच्छेद ३.२१ |
| ४. | खासदारांचे सुविधा केंद्र निर्माण करणे | परिच्छेद ३.३४ |
| ५. | महाविद्यालयांसाठी अनुज्ञेय असलेली विविध कामे | परिच्छेद ३.२१ व ३.२९ |
| ६. | मतदार संघाबाहेर निधी देणे | परिच्छेद २.८ व २.९ |
| ७. | अशासकीय संस्थांमार्फत कामे करणे | परिच्छेद २.११ |
| ८. | रेल्वे विश्राम स्थानक बांधणे | परिच्छेद ३.३५ |
| ९. | प्राण्यांच्या वाहतूकीसाठी वाहने | परिच्छेद ३.२५.१ |
| १० | एक खासदार- एक कल्पना | परिच्छेद ३.३६ |

**टिप- प्रस्तूत यादीत वरील कामांव्यतिरीक्त समावेश नसलेल्या इतर बाबींबाबत प्रश्न उदभवल्यास शासनाकडे संदर्भ करण्यात यावा.**

## परिशिष्ट क्र.२-ब

## खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली खालील कामे यापुढेही चालू राहतील:-

| अ.क्र. | कामाचे वर्णन | विभाग |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रात खाजगी जागांवरील घोषित गलिच्छ वस्त्यात सार्वजनिक उपयोगाच्या बालवाड्या, व्यायाम शाळा बांधणे. | नगर विकास/गृहनिर्माण |
| २. | विविध खेळांच्या एकविध क्रीडा संघटनांद्वारे आयोजित क्रीडा स्पर्धांसाठी अनुदान अनुज्ञेय राहील | शालेय शिक्षण व क्रीडा |
| ३. | मा. आमदार महोदयांना डेस्कटॉप संगणक, लॅपटॉप, i-PAD व प्रिंटर खरेदी. | नियोजन/माहिती व तंत्रज्ञान |
| ४. | तलाठी/मंडळ कार्यालय बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम | महसूल व वने / ग्राम विकास |
| ५. | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात प्रतिक्षागृहे/स्वच्छतागृहे | सार्वजनिक बांधकाम/ग्रामविकास |
| ६. | मुस्लिम/ख्रिश्चन संस्थांच्या जागेवरील स्मशानभूमीच्या विकासाची कामे | ग्राम विकास / नगर विकास |
| ७. | विशेष बाबींच्या प्रकरणांत निर्णय घेण्याचे अधिकार | नियोजन |

## परिशिष्ट क्र.२-क

**खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली विशेष दुरुस्तीची कामे खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील:-**

| अ.क्र. | कामाचे वर्णन | विभाग |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रातील पालिकांच्या मालकीच्या तसेच उपकर प्राप्त इमारती (सेस्ड बिल्डींग), शासकीय मालकीच्या बीडीडी चाळी व बीआयटी चाळी मधील गल्ल्या, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे व त्यांची दुरुस्ती, दुरुस्त न होणाऱ्या शौचालयांची पुनर्बांधणी, सार्वजनिक जिने, पॅसेज व व्हरांडे यांची दुरुस्ती. | नगर विकास / गृहनिर्माण |
| २. | पेयजलाकरीता आवश्यक दुरुस्तीची कामे | पाणी पुरवठा व स्वच्छता / नगर विकास |
| ३. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानुसार शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या आयुर्मान संपलेल्या रस्त्यांची दुरुस्ती | सार्वजनिक बांधकाम/ग्रामविकास |
| ४. | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य सस्थांच्या मालकीच्या अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळा खोल्यांची दुरुस्ती | शालेय शिक्षण व क्रीडा / ग्रामविकास |
| ५. | गलिच्छ, दलित वस्त्यांमधील समाज मंदिरांची दुरुस्ती | नगर विकास / ग्राम विकास |
| ६. | जलयुक्त शिवार अभियानांअंतर्गत दुरुस्ती | जलसंधारण |

## परिशिष्ट क्र.२-ड

**खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय असलेल्या परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये बदलासह अनुज्ञेय करावयाची कामे खालीलप्रमाणे राहतील:-**

| अ. क्र. | कामाचे वर्णन | खा.स्था.क्षे.वि.का.च्या दि.१५.५.२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमधील संदर्भ | आ.स्था.वि.का. मध्ये करावयाची तरतूद/बदल |
|---|---|---|---|
| १. | जेथे विनिर्दिष्टपणे नमुद केलेले नाही,अशा कामासाठी कमाल आर्थिक मर्यादा | परिच्छेद क्र. ३.२६ (केवळ किमान मर्यादा विहित) | कमाल आर्थिक मर्यादा रु. २५ लक्ष राहील. |
| २. | लेखांकन कार्यपद्धत | प्रकरण क्र. ५ | राज्य शासनाच्या प्रचलीत नियमांनुसार राहील. |
| ३. | प्रशासकीय मंजुरी, निधीचे वाटप व व्यवस्थापन | परिच्छेद ३.१४,<br>परिच्छेद ४.१ ते ४.४ व ४.६ | सध्या सुरु असलेल्या पद्धतीप्रमाणेच सुरु राहील. यासाठी खा.स्था.क्षे.वि. का.च्या तरतुदी लागु होणार नाहीत |
| ४. | मतदार संघासाठी एकुण अनुज्ञेय निधीच्या १० टक्के निधी अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती कल्याणासाठी खर्च करणे | परिच्छेद क्र. २.५ | सध्या सुरु असलेल्या तरतुदीनुसार राहील. |
| ५. | लोकसंख्येवर आधारित सामाजिक सभागृह/ सांस्कृतिक सभागृह/ सभामंडपाचे बांधकाम | केंद्र शासन परिपत्रक दि. २०/४/२०१५ | (अ) सामाजिक सभागृह किंवा समाज मंदिर बांधकामे गाव/वार्डाची लोकसंख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे अनुज्ञेय करण्यात येतील.<br>• १००० लोकसंख्येपर्यंत - ३<br>• १००० ते ५००० लोकसंख्येपर्यंत- ६<br>• ५००० ते १०००० लोकसंख्येपर्यंत- ९<br>• १० हजार पेक्षा अधिक- १२<br>(ब) सामाजिक सभागृह / समाज मंदिर बांधकामासाठी किमान मर्यादा ₹७.०० लक्ष राहील. |
| ६. | दिव्यांगांसाठी(अंध,अपंग,कर्णबधीर) विशेष तरतूद (उदा. तीन चाकी सायकल/ काठी/ कर्णयंत्र) | परिच्छेद क्र.३.२३ | दिव्यांगांसाठी विशेष तरतूद **₹१० लक्ष च्या** मर्यादेत.<br>तथापि, वैयक्तिक लाभाची मर्यादा **₹१५ हजार.** |
| ७. | नोंदणीकृत क्रीडा मंडळांना क्रीडा साहित्य खरेदी. | परिच्छेद क्र.३.२७ | क्रीडा साहित्यासाठी खर्चाची कमाल मर्यादा **₹५ लक्ष.** |

**परिशिष्ट ३**
**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**
**कामाच्या परिरक्षण व देखभालीचे हमीपत्र**
**सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्र.३.५ अन्वये हमीपत्र प्राप्त करून घेण्याचा नमुना**

हे काम ग्रामपंचायत / नगरपालीका / नगरपरिषद / नगर पंचायती / जिल्हा परिषद/ महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसा:रण / म्हाडा या संस्थेमार्फत / अभिकरणामार्फत घेण्यात येत असून, सदरचे काम पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल /परिरक्षण, ही / हे ग्रामपंचायत /नगर पालिका/ नगर परिषद / नगर पंचायती /जिल्हा परिषद / महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसा:रण मंडळ/ म्हाडा इत्यादी अभिकरण करण्यास तयार आहे.

( )
संस्थेचे / अभिकरणाचे नाव व शिक्का

ठिकाण :
दिनांक :

## परिशिष्ट क्र.४

## आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामावर लावावयाच्या फलकाचा नमुना

| आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेले काम :- | |
|---|---|
| संबंधित आमदारांचे नाव व कामाचे नांव :- | |
| कामाचे मंजूरीचे आर्थिक वर्ष :- | |
| काम सुरु झाल्याचा दिनांक :- | |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक :- | |
| कामावर करण्यात आलेला एकूण खर्च (₹):- | |
| कार्यान्वयीन यंत्रणा :- | |
| कंत्राटदाराचे नाव :- | |
| दोष निवारणाचा कालावधी :- | |

**परिशिष्ट क्र. ५**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या कामांच्या जिल्हास्तरावरील पथकाकडून केलेल्या तपासणीसंबंधीचा त्रैमासिक अहवाल**

सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्र.६.५ अन्वये पाठवावयाच्या अहवालाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हांचे नाव | |
| २ | अ. अहवालाचे वर्ष<br>ब. तपासणीचा दिनांक | |
| ३ | पथकातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची नावे व पदनामे | |
| ४ | पथकाने भेट दिलेल्या कामांची नावे व ज्या गांवात ही कामे घेतली असतील त्या गांवाचे नांव<br>अ) कामे केलेल्या यंत्रणेचे नाव<br>ब) काम केव्हा मंजूर करण्यात आले.<br>क) कामाला प्रत्यक्ष केव्हा सुरुवात झाली<br>ड) काम केव्हा पूर्ण झाले | |
| ५ | कामाचे स्वरुप व मंजूर केलेला अंदाजित खर्च | |
| ६ | कामे नियोजित ठिकाणी घेतले आहे किंवा कसे व ते पूर्ण झाले आहे किंवा कसे? | |
| ७ | कामावर एकूण झालेला खर्च रुपये. | |
| ८ | काम पूर्ण झाले नसल्यास, पूर्ण न होण्याची कारणे व काम केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे. | |
| ९ | कामाचा सर्वसाधारण दर्जा कसा आहे. | |
| १० | काम मंजूर करतांना जो उपयोग दाखविला होता त्याप्रमाणे त्याचा उपयोग केला जातो किंवा नाही व नसल्यास त्याची कारणे. | |
| ११ | कामामध्ये काही त्रृटी निदर्शनास आल्या आहेत का? असल्यास कोणत्या? | |
| १२ | त्रृटी निदर्शनास आल्या असल्यास त्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली. | |
| १३ | काम पूर्ण झाले असल्यास काम पूर्ण झाल्याबद्दलचा दाखला दिला आहे का व ते काम संबंधित यंत्रणेकडून हस्तांतरित करण्यात आले किंवा कसे? | |
| १४ | शेरा. | |

(तपासणी पथकाच्या प्रमुख अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी)

## परिशिष्ट क्र. ६
## आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्र.६.७ अन्वये
## पाठवावयाच्या अहवालाचा नमूना

**विभाग –** **माहे** **अखेरचा त्रैमासिक अहवाल**

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | जिल्हा | विधान सभा मतदार संघा करिता अनुज्ञेय निधी | विधान परिषद सदस्यां करिता अनुज्ञेय निधी | शासना कडून वितरीत एकूण निधी | अपूर्ण कामांचा तपशील | | नवीन कामांचा तपशील | | | खर्चाचा तपशील | | | | कामाची भौतीक स्थिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कामांची संख्या | अपूर्ण कामे पूर्ण करण्या साठी लागणारा निधी | कामांची संख्या | उपलब्ध अनुदान | चालू वर्षात प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांची अंदाजित रक्कम | अपूर्ण व जुन्या कामा वरील खर्च (रकाना ६ व ७ शी संबंधित) | नविन कामा वरील खर्च (रकाना ८ व १० शी संबंधित) | एकूण खर्च (रकाना ११ + रकाना १२) | प्राप्त अनुदानाची खर्चाची टक्के वारी (रकाना ५ व १३ शी संबंधित) | पूर्ण कामे (रकाना ६ व ८ शी संबंधित) | सुरु कामे (रकाना व ८ शी संबंधित) | सुरु न झालेली कामे (रकाना ६ व ८ शी संबंधित) | रद्द कामे (रकाना ६ व ८ शी संबंधित) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट क्र. -७

## आमदार स्थानिक विकास कार्यक्रम खर्च ताळमेळ - वित्तिय वर्ष : २०

## सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्र.६.९ अन्वये पाठवावयाच्या अहवालाचा नमुना

जिल्हा : (रुपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष /उपशीर्ष क्र. संकेताक | शासनाकडून प्राप्त निधी | महालेखापालाकडे नोंदविलेला खर्च | जिल्हाकडे नोंदविलेला प्रत्यक्ष खर्च | महालेखापाल कार्यालयापेक्षा कमी (-) / अधिक (+ ) नोंदविलेला खर्च | तफावतीचे समर्थन व तफावत दूर केलेले प्रयत्न (नोट ऑफ एरर सादर केली असल्यास त्याचा तपशील) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

परिशिष्ट-८

या कार्यक्रमातुन मंजुर केलेली कामे शिर्षनिहाय खालीलप्रमाणे वर्गिकृत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या वेब साईटवर माहिती नोंदवतांना या वर्गीकरणाचा उपयोग करावा. प्रत्यक्ष कामे मंजुर करतांना ती या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अनुज्ञेय असल्याची खात्री करावी. सदरचे वर्गीकरण हे दिशादर्शक म्हणुन उपयोगात आणु नये.

| शिर्षवार कामांचे वर्गिकरण ( sector wise classification of works) | कामाचा संकेतांक |
|---|---|
| पिण्याच्या पाण्याच्या सुविधा-०१ | |
| १. विंधन विहिरी, ट्युब वेल | ०१०१ |
| २. सामुहिक विहीरी | ०१०२ |
| ३. हातपंप | ०१०३ |
| ४. पाणी पुरवठयासाठी टँकर्स खरेदी | ०१०४ |
| ५. नळ पाणीपुवठा योजना | ०१०५ |
| ६. पाणी साठवण व्यवस्थेसाठी टाकी बसविणे / बांधणे | ०१०६ |
| ७. पाणीपुरवठा योजनेसाठी मोटार पंप बसविणे | ०१०७ |
| ८. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उपकर प्राप्त इमारती, अ वर्ग इमारती मध्ये पेयजलाकरीता विशेष दुरुस्तीची कामे | ०१०८ |
| ९. इतर नागरी व ग्रामीण भागात पेयजलाकरीता विशेष दुरुस्तीची कामे | ०१०९ |
| १०. अस्तित्वात असलेल्या सार्वजनीक पाणीपुरवठा योजनांसाठी नळ मिटर बसविणे | ०११० |
| ११. वर नमूद न करण्यात आलेली पाणी पुरवठयाची कामे | ०१११ |
| | |
| शिक्षण-०२ | |
| १. शासन अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक शाळा, आश्रम शाळा तसेच शारीरीक व मानसिक विकलांग, गतिमंद यांचेसाठी असलेल्या शासन अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक शाळा यांचेसाठी शाळा खोल्या, संगणक कक्षाची बांधकामे, संरक्षण भिंतीची कामे. | ०२०१ |
| २. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या शाळा खोल्यांची विशेष दुरुस्ती | ०२०२ |
| ३. शासकीय, शासन अनुदानीत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना संगणक, एलसीडी प्रोजेक्टर व अनुषंगीक साहित्य पुरविणे | ०२०३ |
| ४. शासकिय तंत्रनिकेतन संस्थांना, शासन अनुदानीत व शासकीय सार्वजनीक वाचनालय यांना संगणक, एलसीडी प्रोजेक्टर व अनुषंगीक साहित्य पुरविणे | ०२०४ |
| ५. सार्वजनीक वाचनालय बांधणे, अभ्यासिका बांधणे | ०२०५ |
| ६. शासन अनुदानीत सार्वजनीक वाचनालयासाठी पुस्तके, रॅक व कपाटे पुरविणे, बार असोशिएशनच्या ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणे | ०२०६ |

| शिर्षवार कामांचे वर्गिकरण ( sector wise classification of works) | कामाचा संकेतांक |
|---|---|
| ७. शासन अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांना खेळाचे साहित्य, अध्यापन साहित्य, डेस्क बेंचेस, गॅस सेफ उपकरण पुरविणे | ०२०७ |
| ८. दि.महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड या संस्थेच्या विविध उपक्रमांना निधी देणे. | ०२०८ |
| ९. अंध, अपंग, मतिमंद व गतीमंद मुलांसाठी चालविण्यात येणा-या शाळांसाठी वर्गखोल्या, स्वच्छता गृहे बांधणे, सुरक्षित क्रिडांगणे, श्रवणयंत्रे व त्यास आवश्यक इतर बाबी तसेच ब्रेल लिपीच्या सॉफ़्टवेअरची कामे व संगणक पुरविणे | ०२०९ |
| १०. वर नमूद न करण्यात आलेली शिक्षणविषयक कामे | ०२१० |
| | |
| विद्युत सुविधा-०३ | |
| १. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे | ०३०१ |
| २.सार्वजनिक वापराकरिता विदयुत खांब व तार जोडणीसहित विदयुत दिवे बसविणे, टान्सफॉर्मर बसविणे | ०३०२ |
| ३.इतर सार्वजनीक विद्युत व्यवस्थेची कामे | ०३०३ |
| | |
| सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण-०४ | |
| १. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरोग्य केंद्रांमध्ये शव विच्छेदन गृह, प्रसुती गृह, प्रतिक्षा कक्ष, संरक्षक भिंत इत्यादी सोयी सुविधांकरिता बांधकाम करणे. | ०४०१ |
| २. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंगणवाडी, बालवाडीची बांधकामे | ०४०२ |
| ३. महानगरपालिका क्षेत्रातील गलिच्छ वस्त्यात खाजगी जागेवर अंगणवाडी,बालवाडी बांधकाम | ०४०३ |
| ४. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी फॉगींग मशिन पुरविणे | ०४०४ |
| ५. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालयांना स्थायी स्वरुपाची वैद्यकीय उपकरणे पुरविणे. | ०४०५ |
| ६. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांना तसेच त्यांच्या रुग्णालयांना रुग्णवाहिका, शववाहिका पुरविणे | ०४०६ |
| ७. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालयांना व अंगणवाडीकरीता वॉटर प्युरीफायर, वॉटर कुलर पुरविणे | ०४०७ |
| ८. शारीरीक विकलांग व्यक्तींना जिवनावश्यक उपकरण पुरविणे | ०४०८ |
| ९. वर नमूद न करण्यात आलेली आरोग्य व कुटुंब कल्याण विषयक कामे | ०४०९ |
| | |
| लघुपाटबंधाऱ्यांची कामे-०५ | |
| १. कोल्हापुर पध्दतीचे बंधारे | ०५०१ |
| २. लघुपाटबंधाराची कामे | ०५०२ |
| ३. वळण बंधारे, वनराई बंधारे | ०५०३ |
| ४. रेन वॉटर हार्वेस्टींग करणे | ०५०४ |
| ५. पुर चारी बांधणे | ०५०५ |
| ६. वर नमूद न करण्यात आलेली लघुपाटबंधाऱ्यांची कामे | ०५०६ |

| शिर्षवार कामांचे वर्गिकरण ( sector wise classification of works) | कामाचा संकेतांक |
|---|---|
| ७. पोकलेन,जेसीबी | ०५०७ |
| | |
| अपारंपारीक उर्जा विकास-०६ | |
| १. सार्वजनीक उपयोगासाठी अपारंपारीक उर्जा साधनांची स्थापना | ०६०१ |
| | |
| इतर सार्वजनीक सुविधा-०७ | |
| १. सामाजिक सभागृह | ०७०१ |
| २. सांस्कृतीक सभागृह | ०७०२ |
| ३. सभामंडप बांधणे | ०७०३ |
| ४. सार्वजनीक वापराच्या इमारती, शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मोकळ्या जागांना संरक्षण भिंत बांधणे | ०७०४ |
| ५. ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम | ०७०५ |
| ६. तलाठी कार्यालय बांधकाम | ०७०६ |
| ७. चावडी | ०७०७ |
| ८. व्यासपिठ / खुला रंगमंच | ०७०८ |
| ९. शासकीय कार्यालयात प्रतिक्षा कक्ष | ०७०९ |
| १०. दलित वस्त्या/गलिच्छ वस्त्या इत्यादि विशिष्ट वस्त्यातील समाज मंदीराची दुरुस्ती | ०७१० |
| ११. महिला बाजार हाट केंद्राची निर्मीती करणे | ०७११ |
| १२. स्मशानभुमी / कब्रस्थान विकसित करणे (प्रेताच्या दहनासाठी स्टँड बांधणे, शेडस् बांधणे, बाकडी बसविणे, पाणी पुरवण्याची सोय करणे, संरक्षण भित बांधणे इत्यादी) | ०७१२ |
| १३. शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांना वॉटर प्युरीफायर, वॉटर कुलर, इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे | ०७१३ |
| १४. या योजनेत अनुज्ञेय इमारतींना कंपाऊंड बांधणे | ०७१४ |
| १५. उद्यानाचा विकास व बालकांसाठी क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देणे. | ०७१५ |
| १६. महानगरपालिका /नगरपालिका /नगरपंचायत क्षेत्रातील मोकळ्या जागेचे मैदानात/ उद्यानात रुपांतर करणे व त्यास कुंपण घालणे | ०७१६ |
| १७. एस.टी. थांब्यावर निवारे (Shades) बांधणे. | ०७१७ |
| १८. एस.टी.महामंडळाचे जागेवर प्रवाशांसाठी प्रतिक्षालय, क्लॉक रुम, वाहतूक नियंत्रण कक्ष बांधणे. | ०७१८ |
| १९. नदी घाट सुशोभित करणे | ०७१९ |
| २०. वाहतुक बेटाची निर्मीती करणे, वाहतुक बेटाचे सुशोभिकरण करणे | ०७२० |
| २१. ट्री गार्ड बसविणे | ०७२१ |
| २२. हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती करणे. | ०७२२ |
| २३. विधानमंडळ सदस्यांना लॅपटॉप/ टॅबलेट/डेस्कटॉप संगणक व लेझर प्रिंटर पुरविणे | ०७२३ |

| शिर्षवार कामांचे वर्गीकरण ( sector wise classification of works) | कामाचा संकेतांक |
|---|---|
| २४. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संगणक, एल.सी.डी.प्रोजेक्टर व अनुषंगिक साहित्य तसेच कार्यालयीन कामकाजासाठी लागणारे सॉफ़्टवेअर पुरविणे. | ०७२४ |
| २५. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयासासाठी आगप्रतिबंधक उपकरणे खरेदी करणे. | ०७२५ |
| २६. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सिक्युरिटी सर्व्हेलियन्स सिस्टीम (सीसीटीव्ही कॅमेरे) बसविणे. | ०७२६ |
| २७. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उपकर प्राप्त इमारती, अ वर्ग इमारती मध्ये सार्वजनिक जिने, पॅसेज व व्हरांडे यांची दुरुस्ती | ०७२७ |
| २८. जिल्हा न्यायालय, जिल्हास्तरीय न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या वकील संघासाठी असलेल्या ग्रंथालयासाठी पुस्तके व संगणक खरेदी करणे | ०७२८ |
| २९. पर्यटन/तिर्थ स्थळावर ऐतिहासीक माहिती दर्शक फलक लावणे, पर्यटकांसाठी सुचना फलक लावणे | ०७२९ |
| ३०. आठवडी बाजाराकरीता ओटे बांधणे | ०७३० |
| ३१. वर नमूद न करण्यात आलेली इतर कामे | ०७३१ |
| | |
| रस्ते विकास/दळणवळण-०८ | |
| १. लहान रस्ते / गल्ल्या | ०८०१ |
| २. पदपथ बांधणे | ०८०२ |
| ३. पुल, साकव बांधणे | ०८०३ |
| ४. रस्ता ओलांडण्यासाठी पदपथ पुल बांधणे | ०८०४ |
| ५. जलवाहतूकीच्या उपयोगासाठी उतारू धक्के बांधणे | ०८०५ |
| ६. वर नमूद न करण्यात आलेली दळणवळणाची इतर कामे | ०८०६ |
| | |
| स्वच्छता-०९ | |
| १. गटार बांधणे, उघडी गटारे बंदिस्त करणे तसेच ड्रेनेजचे बांधकाम करणे. | ०९०१ |
| २. सार्वजनिक शौचालये, स्नानगृहांचे, मुता-यांची बांधकामे व त्याची दुरुस्ती, दुरुस्त न होणा-या शौचालयाची पुनर्बांधणी | ०९०२ |
| ३. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी घनकचरा व्यवस्थापन सुविधा- घंटागाडी, कचरा पेटी व कचरा वाहून नेण्यासाठी वाहन खरेदी करणे. | ०९०३ |
| ४. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी शौचालय स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम इंप्रेयरमेशन. | ०९०४ |
| ५. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी फिरते शौचालय खरेदी करणे | ०९०५ |
| ६. वर नमूद न करण्यात आलेली स्वच्छताविषयक इतर कामे | ०९०६ |
| | |
| क्रीडा-१० | |
| १. व्यायाम शाळेचे बांधकाम | १००१ |
| २. महानगपालिका क्षेत्रातील गलिच्छ वस्त्यात खाजगी जागेवर व्यायाम शाळा बांधकाम करणे | १००२ |

| शिर्षवार कामांचे वर्गिकरण ( sector wise classification of works) | कामाचा संकेतांक |
|---|---|
| ३. व्यायामासाठी साहित्य पुरविणे | १००३ |
| ४. धावन मार्ग तयार करणे (Jogging Track) | १००४ |
| ५. सचिवालय जिमखाना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फ़त आयोजित करण्यात येणा-या आंतरविभागीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी निधी देणे. | १००५ |
| ६. क्रीडा स्पर्धा | १००६ |
| ७. वर नमूद न करण्यात आलेली क्रीडाविषयक इतर कामे | १००७ |